सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३५ | गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## 'दै. ग्लोबल महातेज'च्या बातमीचा दणका !

# तहसीलच्या आवारातील जप्त वाहनांचा १८ फेब्रुवारीला लिलाव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील वाळूच्या अवैध वाहतूकप्रकरणी महसूलने अनेक वाहने जप्त केली आहेत. ही वाहने तहसील आवारात लावण्यात आलेली आहे. परिणामी या आवाराला भंगार बाजाराचे स्वरूप आले आहे. नागरिकांचा श्वास कोंडला जात आहे. याप्रकरणी दै. ग्लोबल महातेजने वेळोवेळी ठळक बातम्या प्रसिद्ध करून या समस्येला वाचा फोडली आहे. याबाबत प्रशासन अखेर खडबडून जागे झाले असून, जप्त केलेल्या वाहनांची बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी लिलाव प्रक्रिया राबविण्याचे आदेश तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी काढले आहेत.



वरवर स्वच्छता आतून भंगार बाजार!

तहसील, प्रांताधिकारी आवारातील स्थिती; वाहनांची विल्हेवाट लावण्याची मागणी



प्रांत, तहसील, दस्त नोंदणी कार्यालयांचा श्वास गुदमरला

सामाजिक कार्यकर्ते संदीप घोरपडे यांनी प्रशासनावर ओढले ताशेरे

*अमळनेर : तहसील आवारातील जप्तीच्या वाहनांबाबत व दयनीय अवस्थेबाबत दै. ग्लोबल महातेजने प्रसिद्ध केलेल्या बातम्या.*

महसूलने दंडात्मक नोटीस देऊनही दंड न भरलेल्या वाहनमालकांविरोधात महसूल अधिनियमानुसार लिलावाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

तालुक्यातील तापी, पांझरा व बोरी नदीपात्रात गेल्या अनेक वर्षांपासून सर्रासपणे सुरू असलेल्या अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीमुळे पर्यावरण, नदीपात्र आणि शासकीय महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर महसूल व पोलिस प्रशासनाकडून विविध टप्प्यांत करण्यात आलेल्या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या २४ वाहनांचा सार्वजनिक लिलाव १८ फेब्रुवारीस तहसील कार्यालयात होणार आहे.

दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू व मुरूमाचे उत्खनन होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. या अवैध व्यवसायामुळे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. पर्यावरणीय समतोलही धोक्यात येत आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी महसूल प्रशासन व पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करून ११ पिकअप व १३ ट्रॅक्टर अशी एकूण २४ वाहने जप्त केली होती. ही सर्व जप्त वाहने तहसील कार्यालय, शासकीय धान्य गोदाम तसेच पोलिस ठाण्याच्या आवारात ठेवण्यात आली होती. मात्र, दीर्घकाळ लिलाव अथवा अंतिम कारवाई न झाल्याने ही वाहने अक्षरशः धुळखात पडली होती. काही वाहने गंजलेली, तर काहींची अवस्था भंगारासारखी झाली होती. त्यामुळे तहसील कार्यालयाचा परिसर एक प्रकारे वाहनांचा कचरा डेपो बनल्याचे चित्र निर्माण झाले होते. या लिलावातून मिळणारी संपूर्ण रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा होणार आहे. आगामी काळात अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात अधिक कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. दै. ग्लोबल महातेजच्या बातमीने न्याय मिळाल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

# व्यापारी संकुल घाणीच्या विळख्यात!

## अवैध कृत्यांचाही बनला अड्डा; पालिकेचे दूर्लक्ष

**नागरिकांमध्ये संताप**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून पालिकेच्या इमारतीजवळील उभारलेले टी.पी. नंबर ६०/१ बी.ओ.टी. व्यापारी संकुल सध्या पूर्णतः दुर्लक्षित आहे. परिसरात घाणीचे साम्राज्य आहे. अवैध कृत्यांचे केंद्र बनले आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेली ही भव्य इमारत अक्षरशः वायाच गेली असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांपूर्वी पालिकेच्या निधीतून हे व्यापारी संकुल बांधण्यात आली होती. त्यानंतर काही दुकानांचा निलावही करण्यात आला. मात्र, सद्यस्थितीत अनेक दुकाने दुर्गंधी आणि घाणीमुळे रिकामी पडली आहेत. देखभाली अभावी संपूर्ण इमारतीची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या व्यापारी संकुलातील प्रत्येक गाळा दारूच्या बाटल्या, पोटल्या, कचरा तसेच शौच-लघूशंकेने माखलेला आहे. पहिल्या मजल्यापासून थेट छतापर्यंत घाणीचे साम्राज्य आहे. मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. इमारतींचा वापर शौचासाठी होत आहे. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.









(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

*अमळनेर : पालिका कार्यालयाच्या इमारतीजवळील व्यापारी संकुल. दुसऱ्या छायाचित्रात व्यापारी संकुलाच्या प्रवेशद्वारावर असलेली घाण. तिसऱ्या छायाचित्रात व्यापारी संकुलातील जिन्याजवळील दयनीय अवस्था. शेवटच्या छायाचित्रात वरच्या मजल्याची दुरवस्था.*

रात्रीच्या वेळी या ठिकाणी गावगुंडांचा वावर वाढलेला आहे. गांजा, दारू, गुटखा यांसारख्या व्यसनांचे सेवन, तसेच महिलांना घेऊन अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या चर्चा नागरिकांकडून होत आहेत. संपूर्ण इमारत खुली असल्याने दोन्ही बाजूने वर जाण्यासाठी जिन्याने अवैध कृत्ये सुरू आहेत. काळी गाळ्यांचे शटरही तोडलेले दिसून येत आहेत. सामान्य नागरिकांकडून कर, पाणीपट्टी व विविध शुल्क वसूल केले जातात. मात्र, कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेची अशी अवस्था होणे ही गंभीर बाब आहे. जनतेच्या पैशातून उभारलेली ही इमारतीची पालिकेच्या निष्काळजीपणामुळे नासधूस होत असल्याचे दिसून येत आहे.



> संबंधित व्यापारी संकुलाबाबत अद्याप पूर्ण माहिती नाही. याबाबत सविस्तर माहिती घेण्यात येईल. पालिकेच्या मीटिंगमध्ये हा विषय मांडून या समस्येचे निराकरण करण्यात येईल. नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची आम्ही काळजी घेत आहोत. शहरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **-डॉ. परीक्षित बाविस्कर, नगराध्यक्ष, अमळनेर.**

# अमळनेरात प्लास्टिकचा 'भस्मासुर' मोकाट..!

## प्रशासन झोपेत, श्री मंगळदेव ग्रह मंदिर ठरले 'अपवाद'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी प्लास्टिक बंदीचे कडक कायदे अस्तित्वात आहेत. मात्र, शहरासह तालुक्यात ही बंदी केवळ कागदावरच आहे. 'सिंगल युज प्लास्टिक'चा वापर सर्रास सुरू आहे. बीडीओ व आरोग्य अधिकाऱ्यांचे याकडे दूर्लक्ष आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, प्रशासकीय यंत्रणा कुचकामी ठरत असताना येथील 'श्री मंगळदेव ग्रह मंदिर' प्रशासनाने मात्र प्लास्टिक मुक्तीचा यशस्वी आदर्श उभा केला आहे.

प्लास्टिकचा अतिवापरामुळे मानवी आरोग्याला कॅन्सर, श्वसन विकार आणि हार्मोनल असंतुलनासारखे गंभीर धोके निर्माण झाले आहेत. केवळ मानवच नव्हे, तर मूक प्राणी आणि जलचरही याला बळी पडतात. जलस्रोतांचे प्रदूषण वाढले आहे. तरीही शहरासह ग्रामीण भागात १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या, स्ट्रॉ, प्लास्टिकचे चमचे, प्लेट्स आणि कप यांची खुलेआम विक्री सुरू आहे. प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. प्लास्टिक बंदी कायदा लागू झाल्यापासून आजवर एकही ठोस कारवाईची नोंद नाही. वर्षातून एखादवेळी थातुरमातुर कारवाई करून मलमपट्टी केली जाते. दुकानांवर धाडी टाकून २० ते २५ हजारांचा दंड वसूल करण्यास आरोग्य अधिकारी व बीडीओ का घाबरतात ? याचा अर्थ प्रशासनाचे एकतर दुर्लक्ष आहे किंवा 'अर्थपूर्ण' तडजोडी सुरू आहेत, असा आरोप धनंजय सोनार यांनी केला आहे. एकीकडे शासकीय यंत्रणा हतबल दिसत असताना, अमळनेरच्या श्री मंगळ ग्रह मंदिर संस्थानाने परिसरात 'सिंगल युज प्लाास्टिक'वर संपूर्ण बंदी घालून शिस्तीचा वस्तुपाठ घालून दिला आहे. एक खाजगी संस्था नियमांचे पालन करू शकते, तर कायद्याचे सर्वाधिकार हातात असणारे स्थानिक प्रशासन कारवाईसाठी मुहूर्त का शोधत आहे? असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे. कायद्याची कडक तरतूद असूनही अंमलबजावणी शून्य आहे, 'प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६' आणि २०२२ च्या सुधारित नियमांनुसार दोषींवर कडक कारवाईची तरतूद आहे. **पहिली चूक:** ५ हजार रुपये दंड **दुसरी चूक :** १० हजार रुपये दंड **तिसरी चूक :** २५ हजार रुपये दंड आणि ३ महिने कारावास एवढे कडक नियम आहेत.

(पान २ वर..)

# (स्व.) अजितदादांच्या अस्थी दर्शनासाठी लोटला जनसागर

## आमदार अनिलदादा पाटलांच्या उपस्थितीत पाडळसे धरणात विसर्जन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दिवंगत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष (स्व.) अजितदादा पवार यांच्या अस्थींचे मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाडळसरे धरणावर आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत विसर्जन करण्यात आले. अस्थीकलश दर्शनासाठी जनसागर लोटला होता. यावेळी सर्वांच्या डोळ्यातून अश्रू तरळत होते.

(स्व.) अजितदादा पवार यांचे अस्थिकलश मंगळवारी दुपारी अमळनेर येथे दाखल झाले. अस्थीकलश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात कार्यकर्त्यांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी राष्ट्रवादी व महायुतीचे शेकडो पदाधिकारी व अजितदादांवर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी दर्शन घेतले. त्यानंतर अस्थिकलश रथयात्रा पाडळसरे धरणाकडे मार्गस्थ झाली. आमदार अनिल पाटील यांनी एका ओपन जिप्सीत अस्थीकलश हातात धरला होता. अमळनेर येथून धार, मारवड, कळमसरे, पाडळसरे मार्गे पाडळसरे धरण येथे पोहोचली. त्यानंतर अस्थींचे धरणात विसर्जन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या प्रतिभा शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पवार, उमेश नेमाडे, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, रवींद्र पाटील आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, प्रताप महाविद्यालयाच्या कॉलेजच्या प्रवेशद्वारावर, धार, मारवड येथील सु.ही.मुंदडे हायस्कूलच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थी व शिक्षकांनी तसेच विविध गावातील ग्रामस्थांनी अस्थीकलशाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली.



*पाडळसरे (ता. अमळनेर) : पाडळसे धरणात (स्व.) अजितदादा पवार यांच्या अस्थी विसर्जन करताना आमदार अनिलदादा पाटील.*

### (स्व.) अजितदादांच्या स्मृती कायम आठवणीत : आमदार अनिलदादा पाटील

(स्व.) अजितदादा पवार यांनी दोन वर्षांपूर्वी पाडळसे धरणाच्या कामाला गती देण्यासाठी भेट दिली होती. त्याच धरणावर आज दुर्दैवाने (स्व.) अजितदादांच्या अस्थीचे विसर्जन करावे लागत आहे, याचे मोठे दु:ख आहे. मात्र, धरणावर हजारो शेतकरी बांधवांची प्रगती अवलंबून आहे. धरणाच्या कुशीत (स्व.) अजितदादांनी कायमस्वरूपी हसत रहावे, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना आहे. अमळनेर तालुका असेल जळगाव जिल्हा असेल किंवा संपूर्ण महाराष्ट्र असेल विकासकामांच्या रूपाने दादांच्या स्मृती कायमस्वरूपी आठवणीत राहतील, अशी भावना आमदार अनिलदादा पाटील यांनी व्यक्त केली.

## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. बापूराव ठाकरे- पाटील**
पत्रकार



**आर.जे. श्री. अमोल देशमुख**
रेडिओ मनभावन, जळगाव



**श्री. महेंद्रशेठ कोठारी**
व्यापारी



**प्रा. श्री. सुरेंद्र पवार**
अमळनेर



**श्री. दिलीप वैद**
अमळनेर



**श्री. मनोज भांडारकर**
माऊली ड्रायव्हिंग स्कूल, अमळनेर

## दिनविशेष

०५ फेब्रुवारी

- स्वतंत्र भारतात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या.
- पुण्याच्या स्वाती घाटे बुद्धिबळात महिला ग्रँडमास्टर बनल्या.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# आजचा दिवस जगा

मृत्यू हे जीवनाचे अंतिम आणि अटल सत्य आहे. तो कधी, कुठे आणि कोणत्या रूपात समोर उभा राहील, याचा नेम नसतो. सकाळी हसत–खेळत घराबाहेर पडलेली व्यक्ती सायंकाळी परत येईलच, याचीही हमी देता येत नाही. तरीही माणूस या कटू वास्तवाकडे डोळेझाक करून रोजच्या धावपळीत, स्पर्धेत, ताणतणावात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत राहतो. 'उद्या काय होईल?' या चिंतेत आजचा अमूल्य क्षण कधी निसटून जातो, ते कळतही नाही.

आजूबाजूला घडणाऱ्या दुःखद घटना क्षणभर आपल्याला थांबवितात. मन सुन्न होते, डोळे पाणावतात आणि आयुष्य किती नाजूक धाग्यावर तोललेले आहे, याची जाणीव होते. अशा वेळी प्रकर्षाने जाणवते, की पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता या साऱ्या गोष्टी येथेच थांबतात. माणसासोबत शेवटपर्यंत जाते ते फक्त त्याने कमावलेले प्रेम, केलेली माणुसकी आणि लोकांच्या मनात उरलेली आठवण. म्हणूनच नातेसंबंधांकडे दुर्लक्ष करणे आपल्यालाच महागात पडते. राग, मत्सर, अहंकार मनात साठवून ठेवण्याऐवजी माफ करणे शिकायला हवे. कारण वेळ कोणासाठीही थांबत नाही. भौतिक सुखे क्षणिक आहेत. ती केवळ मोहमाया आहे. समाधान, प्रेम आणि अंतःकरणातील शांतता हीच खरी आयुष्याची कमाई आहे.

उद्या काय होईल, हे कुणालाच माहीत नाही; पण आजचा दिवस आपल्या हातात आहे. त्यामुळे प्रत्येक क्षण अर्थपूर्ण जगा. मनापासून, प्रामाणिकपणे आणि माणुसकी जपत जगा हाच या वास्तवाचा खरा बोध आहे. नुकतेच अकाली आपल्यातून निघून गेलेले महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे निधन ही अशीच अंतर्मुख करणारी घटना आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी शब्दांत मांडणे कठीण आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच प्रार्थना.

# बोदवडच्या राहुल कोळींचा नाद खुळा!

## शेतात केला अनोखा प्रयोग, ७५ दिवसांत कमावले साडेआठ लाख रुपये

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

"शेती परवडत नाही" अशी तक्रार अनेकदा ऐकायला मिळते. मात्र योग्य नियोजन,आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि बाजारपेठेचा अचूक अभ्यास केला तर शेतीही नफा देणारा व्यवसाय ठरू शकते.

जळगाव जिल्ह्यातील बोदवड तालुक्यातील सुरवाडे बुद्रुक येथील युवा शेतकरी राहुल सुभाष कोळी यांनी सिद्ध करून दाखवले आहे. अवघ्या ७५ दिवसांत कलिंगड लागवडीतून त्यांनी तब्बल साडेआठ लाख रुपयांचे उत्पन्न मिळविले आहे.

**कृषी शिक्षणाचा प्रत्यक्ष शेतात उपयोग**

राहुल कोळी यांनी कृषी क्षेत्रातील शिक्षण पूर्ण केले असून, त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी थेट आपल्या शेतीत केला आहे. सुरवाडे बुद्रुक गावातील गट क्रमांक ८/९ मध्ये त्यांची सुमारे दोन एकर शेती आहे. पारंपरिक पिकांऐवजी वेगळा विचार करत, उन्हाळी हंगाम आणि बाजारातील मागणी लक्षात घेऊन त्यांनी कलिंगड लागवडीचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांच्या यशाचा पाया ठरला.

**दोन एकरांवर नियोजनबद्ध कलिंगड लागवड**

७ नोव्हेंबर २०२५ रोजी राहुल कोळी यांनी दोन एकर क्षेत्रावर कलिंगडाची लागवड केली. लागवडीपूर्वी जमिनीची



तयारी, योग्य वाणाची निवड, तसेच हवामानाचा अभ्यास करण्यात आला. संतुलित खत व्यवस्थापन आणि नियोजित पाणीपुरवठ्यामुळे पीक जोमदार वाढले. विशेषतः फळधारणेच्या काळात पिकाची काळजीपूर्वक निगा राखल्याने उत्पादनाची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात वाढली.

**थेट शेतातून विक्री, दलालांना बगल**

कलिंगडाचे उत्पादन चांगल्या दर्जाचे असल्याने दिल्ली येथील व्यापाऱ्यांनी थेट सुरवाडे बुद्रुक गाठले. शेतातूनच कलिंगडाची खरेदी करण्यात आली. त्यामुळे वाहतूक खर्च कमी झाला आणि मध्यस्थांचा नफा टाळता आला. याच थेट विक्रीमुळे राहुल कोळी यांना अपेक्षेपेक्षा अधिक दर मिळाला आणि उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली.

**अवर्षणप्रवण भागात यशस्वी प्रयोग**

बोदवड तालुका अवर्षणप्रवण म्हणून ओळखला जातो. मोठ्या नद्या, तलाव किंवा कायमस्वरूपी सिंचनाच्या सुविधा येथे फारशा उपलब्ध नाहीत. बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत राहुल कोळी यांनी मर्यादित पाण्यात कलिंगड लागवड यशस्वी करून दाखवली आहे. त्यामुळे या भागातील इतर शेतकऱ्यांसाठीही कलिंगड लागवड हा एक प्रभावी पर्याय ठरू शकतो.

**भविष्यात नव्या प्रयोगांचा निर्धार : राहुल कोळी**

शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीपुरते मर्यादित न राहता आधुनिक शेती पद्धती स्वीकारल्या पाहिजेत. लागवडीपूर्वी बाजारपेठेचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य नियोजन केल्यास कमी कालावधीतही चांगले उत्पन्न मिळू शकते, हा अनुभव त्यांनी स्वतः घेतला आहे. ७५ दिवसांत दोन एकरातून साडेआठ लाखांचे उत्पन्न मिळाल्याने भविष्यात आणखी वेगवेगळे शेती प्रयोग करण्याचा मानस आहे.

# आठवड्यातील मंगळवारची कॅबिनेट बैठक झाली रद्द!

## श्रीमती सुनेत्राताई पवारांची मंत्रालयात उपस्थितीची तारीख ठरली

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी राज्यातील विविध जिल्ह्यात (स्व.) अजित पवारांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी, अनेक ठिकाणी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. दुसरीकडे बारामतीतही पवार कुटुंबीयांच्या सांत्वनसाठी राज्यभरातून कार्यकर्ते पदाधिकारी येत आहेत. त्यासाठी, श्रीमती सुनेत्राताई पवार याही बारामतीत आहेत. मंगळवारी होणारी मंत्रालयात होणारी मंत्रिमंडळ बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे या आठवड्यात मंत्रिमंडळ बैठक होणार नाही.

श्रीमती सुनेत्राताई पवार ९ फेब्रुवारीला मंत्रालयात राज्य मंत्रिमंडळाची बैठक दर मंगळवारी होत असते. मात्र, ही बैठक रद्द करण्यात आली. (स्व.) अजितदादा पवारांचे दुःखद निधन आणि राज्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक रद्द झाली आहे. श्रीमती सुनेत्राताई पवार पुढील दोन दिवस पुणे जिल्ह्यात दौरा करणार आहेत. तर, सोमवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात उपस्थित होणार आहेत, अशी माहितीही सूत्रांकडून मिळाली. दरम्यान, बारामतीत पवार कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी (स्व.) अजित दादाप्रेमी, नागरिक आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे.

(स्व.) अजितदादा पवार यांच्यावर शोकाकुल वातावरणात बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर त्यांचे अस्थिकलश संपूर्ण राज्भरात कार्यकर्त्यांच्या दर्शनासाठी पाठवण्यात आले आहेत. राष्ट्रवादीसह राज्याच्या राजकारणातही मोठा बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्येही (स्व.) अजितदादा पवारांच्या नसण्याचा परिणाम होईल, अशी चर्चा स्थानिक स्तरावर होत आहे. दुसरीकडे पवार कुटुंबीय देखील दुःखातून सावरत राजकीय पाऊले टाकत आहेत. उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा यांनी आज साताऱ्याच्या कराडमधील प्रितीसंगम येथे जाऊन यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेतले. (स्व.) अजितदादा पवारांसमवेत विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या सुरक्षा रक्षक विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यामुळे, आता उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार मंत्रालयात कधी जाणार याची माहिती समोर आली आहे.



अहिल्यानगर : रौप्य पदक पटकावल्याप्रसंगी रोहित भिल.

# प्रताप हायस्कूलचा रोहित भिल राज्यस्तरावर उपविजेता

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील प्रताप हायस्कूलचा विद्यार्थी रोहित विलास भिल याने राज्यस्तरीय बेल्ट रेसलिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याने राज्यस्तरावर रौप्य पदक मिळविले आहे. रोहितने या स्पर्धेत राज्यभरातील नामवंत खेळाडूंशी सामना करत दमदार खेळ दाखवला. त्याच्या उल्लेखनीय यशामुळे शाळेचे, शिक्षकांचे तसेच अमळनेर तालुक्याचे नाव राज्यपातळीवर उज्वल झाले आहे. रोहितच्या यशाबद्दल खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमन सीए नीरज अग्रवाल, संचालक मंडळ, प्रताप हायस्कूलचे मुख्याध्यापक एस. बी. निकम, क्रीडा शिक्षक आदींनी अभिनंदन केले आहे.

पान १ वरून...

# अमळनेरात प्लास्टिकचा 'भस्मासुर' मोकाट..!

मात्र, विक्रेते निर्भयपणे व्यवसाय करत आहेत, हे प्रशासनाचे अपयश आहे. नागरिकांनी केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता, स्वतः पुढाकार घेणे गरजेचे आहे. बाजारात जाताना कापडी पिशवी सोबत बाळगावी. लग्नसमारंभ किंवा कार्यक्रमांत प्लास्टिकचे कप, चमचे, प्लेट्स वापरणे कटाक्षाने टाळावे. मागणीच बंद झाली तर पुरवठा आपोआप थांबेल, हे भान ग्राहकांनी ठेवावे. व कुठेही बेकायदेशीर प्लास्टिक साठा किंवा विक्री आढळल्यास जागरूक नागरिकांनी त्याचे फोटो 'स्वच्छता ॲप'वर अपलोड करावेत किंवा मुख्याधिकारी व 'एमपीसीबी'च्या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन धनंजय सोनार यांनी केले आहे.

# दूषित पाणीपुरवठ्याची तक्रार करा आता मोबाईलवर..!

## अमळनेर पालिका : नागरिकांमध्ये समाधान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिकेने शहरातील विविध भागात पाईपलाईन लिकेज दुरूस्ती अथवा दूषित पाणीपुरठ्याची तक्रार असल्यास नागरिकांना मोबाईलवर संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नागरिकांनी (९८३४६५४८८९) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. कार्यालयीन वेळेत सकाळी ९. ४५ ते सायंकाळी ६. ३० वाजेपर्यंत नागरिक तक्रार नोंदवू शकतात. (सुटीचे दिवस वगळून) तसेच कार्यालयातील वेळेव्यतिरिक्त व्हॉट्सॲप व एसएमएसद्वारे वरील क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल, असेही आवाहन पालिकेने केले आहे.

# पत्नीसह प्रियकराने अपशब्द वापरल्याने पतीची आत्महत्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पत्नी व तिच्या प्रियकराने अपशब्द वापरल्याने दुखावलेल्या पतीने थेट रेल्वेखाली आत्महत्या केली. ही घटना गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी याप्रकरणी पत्नी व तिच्या प्रियकरासह तीन जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा मंगळवार, दि. ३ जानेवारी रोजी येथील पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे.

सुनील श्रावण भोई (वय ३४, रा. रुबजीनगर, अमळनेर) असे आत्महत्या केलेल्या पतीचे नाव आहे. सुनीलची पत्नी दीपाली भोई (३०) व तिचा प्रियकर अजय छोटू भोई (३२) आणि त्याची आई सुरेखा छोटू भोई, अशा तिघांवर येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. प्रियकर अजय भोई याला अटक झाली आहे.

## त्यांना लाज वाटायला पाहिजे..!

# प्रफुल पटेल टीकाकारांवर चांगलेच संतापले...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

उपमुख्यमंत्री (स्व.) अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. (स्व.) अजितदादा यांच्यानंतर आता पक्षाचे अध्यक्ष हे प्रफुल पटेल आहेत, अशा वावड्या उठल्या. त्यावर पटेलांनी स्पष्टीकरणही दिले. त्यानंतर कोणीही दुसरा मराठी नेता राष्ट्रवादीचा नेता राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष करा पण प्रफुल पटेल नको असेही काही नेत्यांनी म्हटले. त्यावर संताप व्यक्त करत प्रफुल पटेल यांनी मंगळवा, दि. ३ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेत त्यांच्यावर हल्लाबोल केला आहे. महाराष्ट्रातील जनतेकडून त्यांनी कधी एक मतही मिळवण्याचा प्रयत्नही केलेला नाही, ते लोक आमच्यासारख्या लोकांबद्दल उलट सुलट बोलतात, प्रचार करतात, चर्चा करतात, वक्तव्ये करतात, ते योग्य आहे का? १९५२ पासून माझ्या वडीलांना महाराष्ट्राच्या जनतेने निवडून दिले. मी अनेकदा महाराष्ट्रातील जनतेकडून निवडून गेलो. आमच्याबद्दल आणि आमच्या पार्श्वभूमीबद्दल कमेंट करत असतील तर त्यांना लाज वाटली पाहिजे, अशी गोष्टी ते करत आहेत, असेही पुढे पटेल म्हणाले आहेत.



मी एक जनप्रतिनिधी म्हणून तुमच्यासमोर बसलो आहे. पक्षाचा निर्णय योग्य होईल, योग्य दिशेने होईल आणि योग्य व्यक्तीने होईळ आणि माझ्याशिवाय होईल यापलिकडे मी काय म्हणावे. आमच्याकडून काहीही आलेले नसताना उगाच बोलणे आणि वादळ निर्माण करणे आणि आमच्या पक्षात संशय निर्माण करणे ही घाणेरडी गोष्ट आहे. मला यापलिकडे काही बोलायचे नाही, मी आणखी काय खुलासा करू, माझ्याशिवाय पक्षाचा कोणीतरी असेल, अजितदादांनंतर कोण, कसे, कधी ही जबाबदारी माझ्यावर आहे, ती जबाबदारी मी पार पाडेन.

**विलीनीकरणाबाबत स्पष्टच बोलले**

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेवरती पटेल म्हणाले, की विलीनीकरणाबाबत (स्व.) अजितदादांची माझ्याशी काही चर्चा झाली की नाही. त्यांचीच चर्चा झाली असे लोक म्हणत आहेत. विलीनीकरणाबाबत आम्हाला माहीत नाही असे होऊ शकत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात प्रत्येक पक्षाने वेगवेगळ्या ठिकाणी वेगवगेळी भूमिका घेतली. काही ठिकाणी आम्ही भाजपसोबत राहिलो. काही ठिकाणी शिंदेंसोबत राहिलो. स्थानिक स्वराज्यमध्ये दादांनी सांगितले आपण सर्व वेगवेगळे लढत आहोत. आपली मते विभागली तर फरक पडू शकतो. त्यामुळे शरद पवार गटाशी बोलून समन्वय घडवू असे अजितदादा म्हणाले होते. तेवढीच चर्चा झाली, असे सांगत प्रफुल्ल पटेल यांन विलीनीकरणाच्या चर्चा फेटाळून लावल्या. तसचे दादांचे मी दोन इंटरव्ह्यू बघितले. त्यात त्यांनी स्पष्ट केले होते, की आमच्यासमोर विलीनीकरणाचा प्रस्ताव नाही, अशी पुष्टीही त्यांनी जोडली. तसेच फक्त स्थानिक स्वराज्यसाठी ती युती होती. शरद पवार यांना आम्ही भेटतो. सुप्रियाताईंना भेटतो. आमचा विधिमंडळाचा निर्णय होईल, उपमुख्यमंत्रीपद, त्यानंतर कार्याध्यक्ष म्हणून मी आमच्या पक्षाचा निर्णय घेणार आहे, ही जबाबदारी माझ्यावर आहे. पुढच्या प्रोसेस पूर्ण करायच्या आहेत, त्या मी पार पाडत आहे, त्याबद्दल आम्ही प्रोसेस करत असताना लोक उलट सुलट बोलत आहेत. मी या स्पर्धेमध्ये नव्हतो, राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकाने जरी माझे नाव घेतले आहे का? असाही प्रश्न त्यांनी केला.

**राज ठाकरेंच्या पोस्टवर काय म्हणाले?**

राज ठाकरे वाकरे माझ्या पक्षाचे आहेत का? त्यांनी ठरवायचे आहे का? माझ्या पक्षाचा विधिमंडळाचा नेता कोण? अध्यक्ष कोण हे आम्ही ठरवायचे, की राज ठाकरे किंवा इतर कोण जे आहेत. सकाळी नऊ वाजताचे बुलेटीन वगैरे, वगैरे हे सगळे लोक येऊन आम्हाला सांगतात. आम्ही आमच्या पक्षांमध्ये काय करायला पाहिजे, आम्ही आधीपासून योग्य निर्णय घेतलेला आहे. दुसरा योग्य निर्णय घेण्याच्या प्रोसेसमध्ये आहोत असेही प्रफुल पटेल यांनी स्पष्ट केले.

**राज ठाकरेंची पोस्ट काय?**

"महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे. त्यावर खरेतर भाष्य पण करावे असे वाटत नाही. मात्र, तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरु आहेत त्यावर बोलावेच लागेल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही!"


## कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर जि.जळगांव

जा.नं.७४८/ला.फि.२०२६-२७ अमळनेर दि.२३/०१/२०२६

### सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अनुज्ञप्ती लायसेन्स फी भरणेबाबत

### जाहीर नोटीस

सर्व अनुज्ञप्ती धारक-

अडते, खरेदीदार कापूस खरेदीदार, भाजीपाला अडते, खरेदीदार, किरणा दुकानदार, हमाल, मापाडी, प्रक्रिया धारक, मदतनीस, गुरे, शेळ्या, मेंढ्या खरेदीवर इ. घटक यांना कळविण्यात येते की,

महाराष्ट्र शासनाने बाजार समितीच्या नियमात बदल केलेला असून अधिनियम १९६३ अंतर्गत त्या अनुषंगाने झालेल्या नियमांमधील सुधारणे नुसार उपरोक्त नियम-२, खंड १० नुसारच्या व्याख्येमध्ये बदल केला असून त्यानुसार बाजार समितीचे नविन वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विनियमन) नियम १९६७ च्या ६ च्या पोटनियम ५ (अ) व नियम ७ च्या पोटनियम २ (अ) मध्ये करण्यात आलेला सुधारणेत अनुसरुन प्रत्येक घटकास कळविण्यात येते की,

अनुज्ञप्ती सन २०२६-२७ करीता अनुज्ञप्ती नुतनीकरणाचे अर्ज दि. २८ फेब्रुवारी २०२६ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत करावयाचे आहेत. (सुटीचे दिवस सोडून) ज्यांना नुतनीकरण करावयाचे असेल त्यांनी बाजार समिती कार्यालयातून अर्ज घ्यावे तसेच अर्ज सादर करणेपूर्वी मागील संपूर्ण येणे रक्कम भरावयात अन्यथा नुतनीकरणासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. कार्यालयातून योग्य माहिती घ्यावी व अर्जाची पूर्तता करावी. तसेच नविन लायसेन्स घेणाऱ्यांना योग्य ती माहिती कार्यालयातून मिळेल.

टीप १) लायसेन्स नुतनीकरण करतांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत बाजार फी व शेड / गाळे भाडे पेडचा दाखला जोडणे बंधनकारक आहे.

२) मुदतीत लायसेन्स नुतनीकरण न केल्यास महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियमन १९६३ व १९६७ च्या तरतुदीनुसार ३१ मार्च २०२६ नंतर येणाऱ्या अर्जाची योग्य ती लेट फी आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

डॉ. उन्मेषकुमार रोहिदास राठोड
सचिव

श्री. प्रकाश काशिनाथ वाणी
अनुज्ञप्ती समिती, चेअरमन

श्री. अशोक आधार पाटील
सभापती

## कृषि उत्पन्न बाजार समिती अमळनेर, जि. जळगांव


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# एअर इंडिया आणि इंडिगो विमानांचे पंखे एकमेकांना घासले!

## मुंबई विमानतळावर मोठा अनर्थ टळला!


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

(स्व.) अजितदादा पवारांच्या विमान अपघाताची बातमी ताजी असतानाच आता मुंबई विमानतळावर एक मोठा अनर्थ टळला. मुंबई विमानतळावरील टॅक्सीवेवर एअर इंडिया आणि इंडिगो यांच्या विमानांचे पंखे एकमेकांना घासले गेले. ही घटना मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी घडली. एअर इंडियाच्या टेक-ऑफपूर्वी आणि इंडिगो विमानाच्या लँडिंगनंतर टॅक्सींग दरम्यान दोन्ही विमानांच्या पंख्यांचा परस्पर संपर्क झाला. सुदैवाने या घटनेत सर्व प्रवासी सुरक्षित असून, दोन्ही विमान कंपन्यांनी अधिकृत निवेदन जारी केले आहे.

एअर इंडियाचे (एआय २७३२) हे उड्डाण ३फेब्रुवारी रोजी मुंबईहून कोईंबतूरकडे जाणार होते. टेक-ऑफपूर्वी हे विमान टॅक्सीवेवर थांबले असताना त्याचवेळी लँड झालेले इंडिगो विमान (In-diGo flight ६ई ७९१) टॅक्सिंगसाठी त्या ठिकाणी येत होते. यावेळी इंडिगो विमानाच्या पंख्याची आणि एयर इंडिया विमानाच्या पंख्याची एकमेकांना धडक बसली.

### सर्व प्रवाशांना सुरक्षित उतरवले

या धडकेत एअर इंडियाच्या विमानाच्या पंख्याचे म्हणजे विंगटिपचे नुकसान झाले. खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित विमान पुढील तांत्रिक तपासणीसाठी ग्राउंड करण्यात आले. त्यातील सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरविण्यात आले आहे. त्यांना गंतव्यस्थानी पोहोचवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले.



इंडिगोचे विमान हे हैदराबादहून मुंबईला पोहोचले. लँडिंग झाल्यानंतर टॅक्सिंग दरम्यान ही घटना घडल्याचे इंडिगो कंपनीने स्पष्ट केलं. विमानाचे टॅक्सिंग केल्यानंतर सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरविण्यात आले. संबंधित विमानाची देखभाल तपासणी केल्याची माहिती इंडिगोने दिली.

### घटनेनंतरची दोन्ही विमानांची तपासणी

दोन्ही कंपन्यांनी या घटनेची माहिती तत्काळ संबंधित नियामक प्राधिकरणांना दिली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सावधगिरीचा उपाय म्हणून दोन्ही विमानांची सखोल तांत्रिक तपासणी केली जात आहे.

### प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

एअर इंडिया आणि इंडिगो या दोन्ही कंपन्यांनी प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षितता हीच सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले. या घटनेमुळे प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल एअर इंडिया आणि इंडिगो विमान कंपनीने दिलगिरी व्यक्त केली आहे. या घटनेमुळे विमानतळावरील टॅक्सिंग प्रक्रियेबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले असून, चौकशीनंतर नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# कीस तरह भारत की एक और एजेंसी है 'कॉईन'? क्या काम करते हैं ये जासूस?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'तस्करी' नाम की वेबसीरीज में दिखाया गया है कि कैसे भारत की वित्तीय खुफिया एजेंसी के एजेंट विदेशों में तैनात रहते हैं और उनके सीक्रेट इंफोर्मेशन के आधार पर एक के बाद एक यहां कार्रवाई होती है । ये कहानी फिल्मी भले ही है, लेकिन विदेशों में तैनात जिन खुफिया जासूसों को दिखाया गया है और जिस कॉईन (COIN) नाम की एजेंसी का जिक्र हुआ है, वो सच्ची है । ऐसे में जानते हैं इस सीक्रेट एजेंसी की पूरी कहानी क्या है और कैसे इसके जासूस बनते हैं ।

अभी बॉलीवुड एक्टर इमरान हाशमी की 'तस्करी' नाम की एक वेब सीरीज आई है. इसमें भारत की एक ऐसी इंटेलिजेंस एजेंसी के बारे में दिखाया गया है, जिसके बारे में काफी कम लोगों को पता होगा । रॉ की तरह इसके एजेंट भी विदेशों में सीक्रेट तरीके से तैनात रहते हैं ।

इस एजेंसी का नाम है - COIN (कस्टम्स ओवरसीज इंटेलिजेंस नेटवर्क). ऐसे में समझते हैं कॉईन का काम क्या होता है और इसके एजेंट कैसे काम करते हैं । कॉईन डायरेक्ट्रेट ऑफ रेवेन्यू इंटेलिजेंस की एक स्पेशल यूनिट है । कॉईन का काम विदेशों में भारत से जुड़ी तस्करी, मनी लॉन्ड्रिंग और वित्तीय धोखाधड़ी जैसी गतिविधियों पर गुप्त तरीके से नजर रखना और इनसे जुड़ी जानकारी डीआरआय को भेजना है । कॉईन में तैनात अधिकारी डीआरआय और विदेशों के बीच विश्वसनीय कार्रवाई योग्य इनपुट देने में एक महत्वपूर्ण कड़ी के जैसे होते हैं ।

**कैसे काम करते हैं एजेंट**

कॉईन एजेंट के इनपुट भारत में डीआरआय की कार्रवाई के लिए काफी महत्वपूर्ण होते हैं । क्योंकि इसी के आधार पर आगे कार्रवाई की जाती है । कॉईन यूनिट्स विदेश से इकट्ठा की गई या जोनल यूनिट्स से रिक्वेस्ट पर मिली इंटेलिजेंस को आगे भेजती हैं, जो डीआरआय की जांच में मदद करती है ।

कस्टम्स ओवरसीज इंटेलिजेंस नेटवर्क में तैनात अधिकारियों की सतर्कता की वजह से कोविड- १९ महामारी के दौरान भी डीआरआय ने कई मनी लॉन्ड्रिंग और स्मगलिंग से जुड़े नेटवर्क का पर्दाफाश करने में सफलता पाई. कॉईन के एजेंट प्रतिबद्धता और प्रोफेशनलिज्म के साथ अपनी जिम्मेदारियों को निभाते हैं और भारत के हितों की रक्षा में महत्वपूर्ण योगदान देते हैं ।

ईरान में इजरायल के पॉइंट टू पॉइंट अटैक । मोसाद की इस रणनीति ने फिर चौंका दिया । इस स्पेशल इंटेलिजेंस यूनिट के एजेंट विदेशों में भारतीय एंबेसी के साथ मिलकर काम करते हैं । एक तरह से वही इनका ऑफिस होता है. २०१९ में चीन की राजधानी बीजिंग स्थित भारतीय दूतावास में कॉईन के दो एजेंट नियुक्त किए गए थे । इनका काम चीन से भारत के बीच होने वाली तस्करियों और वित्तीय धोखाधड़ी से संबंधित गतिविधियों पर नजर रखना था ।

मीडिया रिपोर्ट के मुताबिक, डीआरआई के अधिकारियों ने बताया था कि चीन से होने वाले कारोबार में सीमा शुल्क धोखाधड़ी और तस्करी पर निगरानी रखने के लिए कॉईन एजेंट्स की जरूरत थी । भारतीय एजेंसियों के साथ खुफिया जानकारी साझा करके व्यापार आधारित मनी लॉन्ड्रिंग, काले धन और कर चोरी की जांच में कॉईन एजेंट महत्वपूर्ण भूमिका निभाते हैं । तब विदेशों में इनकी तैनाती कैसे होती है, इसको लेकर भी कुछ जानकारियां सामने आई थी ।

**कैसे होती है एजेंट की विदेशों में तैनाती**

इस सीक्रेट इंटेलिजेंस यूनिट के सदस्यों की तैनाती जरूरत के हिसाब से होती है। ईटी की एक रिपोर्ट के मुताबिक, नाम न छापने की शर्त पर डीआरआई के एक अधिकारी ने कॉईन एजेंटों की नियुक्ति प्रक्रिया के बारे में बताया था। इसके तहत डीआरआई के अफसरों की ही विदेशों में कॉईन एजेंट या पदाधिकारी के तौर पर तैनाती होती है, लेकिन ये इतना भी आसान नहीं होता है कि किसी को भी नियुक्त कर दिया जाए। कॉईन एजेंटों की नियुक्ति विदेश मंत्रालय की सहमति और प्रधानमंत्री की अध्यक्षता वाली कैबिनेट की नियुक्ति समिति की अंतिम स्वीकृति के बाद होती है।

पहले डीआरआई, वस्तु एवं सेवा कर खुफिया महानिदेशालय, राष्ट्रीय सीमा शुल्क, उत्पाद शुल्क व नारकोटिक्स अकादमी और मानव संसाधन विकास महानिदेशालय के महानिदेशकों की एक इवेल्यूएशन कमेटी कॉईन एजेंट बनने के दावेदार उम्मीदवारों की सेवा का मूल्यांकन करती है।

यह भी पढ़ें: कितनी खतरनाक है रूस की खुफिया एजेंसी KGB, जिसमें कभी 'जासूस' थे पुतिन!

उन्होंने बताया कि केंद्रीय अप्रत्यक्ष कर एवं सीमा शुल्क बोर्ड के अध्यक्ष, दो सदस्यों और डीआरआई के महानिदेशक वाली एक उच्च स्तरीय समिति इन उम्मीदवार अधिकारियों का साक्षात्कार लेती है. इसके बाद बोर्ड प्रत्येक पद के लिए तीन अधिकारियों के एक पैनल की सिफारिश वित्त मंत्री को भेजती है. वित्त मंत्री की मंजूरी मिलने के बाद, पैनल को विदेश मंत्रालय की सहमति के लिए भेजा जाता है. इसके बाद अंतिम मंजूरी के लिए इसे कैबिनेट की नियुक्ति समिति को भेजा जाता है. वहां से मंजूरी मिलने के बाद ही इनकी तैनाती विदेशों में होती है.



# कोणत्या राज्यातून होतात सर्वात जास्त कलेक्टर, आयपीएस ?

## वाचून व्हाल चकित!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

युपीएससी ही भारतातील सर्वात अवघड परीक्षा मानली जाते. ही परीक्षा पास होणारे विद्यार्थी अधिकारी म्हणून काम करतात. भारतातील कोणत्या राज्यातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर ही परीक्षा पास होतात, याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**उत्तर प्रदेश (सर्वाधिक यशस्वी राज्य) :** भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले हे राज्य युपीएससी परीक्षेत सातत्याने प्रथम क्रमांकावर राहिले आहे. २०२४ च्या निकालात शक्ती दुबे (एआयआर १) ही उत्तर प्रदेशचीच आहे. गेल्या ५ वर्षांपैकी ४ वेळा याच राज्याच्या विद्यार्थ्यांनी देशात पहिला क्रमांक पटकावला आहे.

**बिहार (दुसऱ्या क्रमांकावर) :** प्रशासकीय सेवांचे माहेरघर मानले जाणारे बिहार हे राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. बिहारच्या ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये आयएएस (आयएएस) होण्याचे प्रचंड आकर्षण असते आणि तेथील विद्यार्थी कठोर परिश्रमासाठी ओळखले जातात.

**राजस्थान (तिसऱ्या क्रमांकावर) :** गेल्या काही वर्षांत राजस्थानमधून यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. सध्या हे राज्य 'आयएएस' अधिकारी देण्याच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.



**महाराष्ट्र आणि तमिळनाडू :** महाराष्ट्रातून दरवर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण होतात. २०२४ च्या निकालात पुण्याच्या अर्चित डोंगरे (एआयआर ३) याने देशात तिसरा क्रमांक मिळवला आहे. तमिळनाडू देखील दक्षिण भारतातील सर्वाधिक यशस्वी विद्यार्थी देणारे राज्य आहे.

दिल्ली (युपीएससीचा हब) : दिल्ली हे एक केंद्रशासित प्रदेश असले तरी, तिथून सर्वाधिक उमेदवार निवडले जातात. याचे मुख्य कारण म्हणजे देशभरचे विद्यार्थी तयारीसाठी दिल्लीत (मुखर्जी नगर किंवा ओल्ड राजेंद्र नगर) येतात आणि तिथूनच परीक्षा देतात.

# तारा तुटला की इच्छा पूर्ण होते? शास्त्रज्ञ काय सांगतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

असे म्हणतात तारा तुटला की इच्छा पूर्ण होते? काय आहे या मागचे सत्य श्रद्धा की अंधश्रद्धा जाणून घ्या. तारा कधीच तुटत नाही. शास्त्रज्ञांच्या मते, आकाशातील तारे हे सूर्यासारखे प्रचंड मोठे वायूचे गोळे असतात. ते पृथ्वीपासून कोट्यवधी किलोमीटर दूर असतात. एखादा छोटा तारा जरी पृथ्वीच्या जवळ आला, तर संपूर्ण पृथ्वी नष्ट होईल. त्यामुळे ज्याला आपण तारा तुटणे म्हणतो, तो प्रत्यक्ष तारा नसतोच.



**उल्काभ :** अंतराळात फिरणारे धुलीकण, दगड किवा धुमकेतूंचे अवशेष जेव्हा पृथ्वीच्या वातावरणात शिरतात, तेव्हा त्यांना 'उल्का' म्हटले जाते. हे दगड आकाराने वाळूच्या कणापासून ते मोठ्या खडकापर्यंत असू शकतात. घर्षण हे कण पृथ्वीच्या वातावरणात ताशी ७० ते ८० हजार किलोमीटर वेगाने शिरतात. हवेसोबत होणाऱ्या प्रचंड घर्षणामुळे ते तापतात. जळून खाक होतात, याच प्रक्रियेत प्रकाशाची एक वेगवान रेघ दिसते. जिला आपण 'तारा तुटणे' म्हणतो.

**इच्छापूर्ती :** प्राचीन काळी जेव्हा लोकांना खगोलशास्त्राचे ज्ञान नव्हते. तेव्हा आकाशातील या अचानक होणाऱ्या बदलांना ते 'दैवी संकेत' मानू लागले. त्यातूनच तारा तुटताना इच्छा मागण्याची प्रथा सुरू झाली. ज्याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही.

टॉलेमीचा सिद्धांत : ग्रीक खगोलशास्त्रज्ञ टॉलेमी याने असे सुचवले होते की, जेव्हा देव पृथ्वीवर काय चालले आहे हे पाहण्यासाठी स्वर्गाचे दरवाजे उघडतात. तेव्हा काही तारे खाली पडतात. त्याच वेळी देवाला आपली इच्छा सांगितली तर ती पूर्ण होते, अशी तेव्हा समजूत होती.

**सांख्यिकीय योगायोग :** जर एखाद्याने इच्छा मागितली आणि ती योगायोगाने पूर्ण झाली, तर लोक त्याचा संबंध ताऱ्याशी जोडतात. विज्ञानात याला 'कन्फर्मेशन बायस' असे म्हणतात. जिथे आपण फक्त आपल्या विश्वासाला पुष्टी देणाऱ्या घटना लक्षात ठेवतो.

**उल्कावर्षाव :** वर्षातील काही ठराविक दिवसांत पृथ्वी धुमकेतूंच्या मार्गातून जाते, तेव्हा एकाच वेळी शेकडो उल्का पडताना दिसतात. जर तारा तुटल्याने इच्छा पूर्ण होत असती, तर उल्कावर्षावाच्या वेळी मागितलेल्या सर्व इच्छा पूर्ण व्हायला हव्या होत्या, जे घडत नाही.

**विज्ञानाचा सल्ला :** शास्त्रज्ञांच्या मते, इच्छा केवळ 'मागून' नव्हे तर 'प्रयत्नांनी' पूर्ण होतात. आकाशातील ही घटना केवळ एक निसर्गरम्य खगोलीय चमत्कार म्हणून पाहणे आणि त्याचा आनंद घेणे अधिक योग्य आहे.

# टॅक्सी ड्रायव्हरची मुलगी ते आयएएस ऑफिसर!

सक्सेस स्टोरी

## प्रत्येकाला प्रेरणा देणारी सी. वनमती यांची यशोगाथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयएएस सी. वनमती तमिळनाडूच्या एका सामान्य कुटुंबातून येतात. त्या वडिलांच्या टॅक्सी ड्रायव्हरच्या व्यवसायातून आर्थिक अडचणींवर मात करत, चौथ्या प्रयत्नात यूपीएससी २०१५ मध्ये एआयआर १५२ रँक मिळवून आयएएस अधिकारी बनल्या. आज त्या महाराष्ट्रात स्टेट टॅक्स विभागाच्या जॉइंट कमिश्नर (एनफोर्समेंट) म्हणून कार्यरत आहेत आणि लाखो तरुणांसाठी प्रेरणास्रोत ठरल्या आहेत.

सी. वनमती यांची कहाणी संघर्ष आणि मेहनतीचे प्रतीक आहे. त्यांनी लहानपणी म्हशी चरायला नेल्या आणि घरकामातही हातभार लावला. या कठीण परिस्थितीतही त्यांच्या पालकांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. वनमती यांनीही अभ्यासावर आणि मेहनतीवर कधीही लक्ष केंद्रित करणे सोडले नाही. नातेवाईकांच्या लग्नाच्या दबावामुळेही वनमती यांनी आपले शिक्षण सुरू ठेवले आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यांना एका महिला कलेक्टरला पाहून आणि 'गंगा यमुना सरस्वती' या टीव्ही मालिकेमुळे आयएएस बनण्याची प्रेरणा मिळाली. येथूनच त्यांनी एक दिवस देशाची सेवा करण्यासाठी अधिकारी बनण्याचा निश्चय केला.



### जिद्द आणि मेहनतीचे फळ

यूपीएससीचा मार्ग वनमतींसाठी सोपा नव्हता. त्या तीन वेळा परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्या, पण त्यांनी हार मानली नाही. अखेरीस, चौथ्या प्रयत्नात २०१५ च्या नागरी सेवा परीक्षेत त्यांनी एआयआर १५२ रँक मिळवली आणि त्या आयएएस अधिकारी बनल्या.

आज सी. वनमती महाराष्ट्र कॅडरमध्ये कार्यरत आहेत. त्या स्टेट टॅक्स विभागाच्या जॉइंट कमिश्नर (एनफोर्समेंट) या पदावर सेवा देत आहेत. त्यांचा हा प्रवास सिद्ध करतो की जर जिद्द आणि मेहनत असेल, तर कोणतेही स्वप्न अपूर्ण राहत नाही.

### लाखो तरुणांसाठी प्रेरणा

एका सामान्य कुटुंबातून येणाऱ्या वनमती यांनी बालपणीच्या अडचणी, आर्थिक तंगी आणि सामाजिक दबाव यांना दुर्लक्षित करून यूपीएससी परीक्षेत यश मिळविले आणि लाखो तरुणांसाठी प्रेरणा बनल्या. एका व्हिडिओ मुलाखतीनुसार सी. वनमती यांचे बालपण खूप सामान्य होते. त्यांचे वडील टॅक्सी ड्रायव्हर होते आणि आर्थिक परिस्थिती खूपच कमकुवत होती. वनमती यांनी बालपणी म्हशी चरायला नेल्या आणि घरकामात कुटुंबाला मदत केली. परंतु या कठीण परिस्थितीतही पालकांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्याचे फळ त्यांना मिळाले आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाउस पारोला रोड, धुळे




# श्रीदत्त बावन्नीचे महात्म्य म्हणजे काय ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**प्रश्न १ : दत्त बावन्नी कोणी लिहिली? त्याचे महात्म्य काय आहे?**
**उत्तर : अ)** दत्त संप्रदायातील महान अधिकारी प. प. टेंबे स्वामी महाराजांचे शिष्य प. पू. रंगावधुत महाराज (नारेश्वर) यांनी १९३५ साली सिद्धनाथ महादेवाच्या मंदिरात माघ शुद्ध प्रतिपदेला दत्त स्तुती पर अद्भुत असे स्तोत्र लिहिले.
**ब)** दत्तगुरूंनी कृपावंत होऊन पिशाच्च बाधा झालेल्या, आधी-व्याधीने ग्रस्त अशा लक्ष्मीबेन त्रिपाठी यांच्या साठी पू. बापजींकडून म्हणजे पू. रंगावधुत स्वामींच्या कडून ही दत्त बावन्नी लिहून घेतली. दत्त संप्रदायात " दत्त बावन्नीला " एटॉम बॉम्ब असे म्हणतात. सर्व मनोकामना परिपूर्ण करणारे हे दिव्य असे स्तोत्र आहे.
**क)** श्रीगुरुचरित्र, श्रीदत्त पुराण, श्रीदत्त महात्म्य, श्रीपाद चरित्रामृत या सर्व ग्रंथांचे सार स्वरूप म्हणजे श्री दत्त बावन्नी हे स्तोत्र आहे.

**प्रश्न २ : या स्तोत्राला दत्त बावन्नी असे का म्हणतात ?**
**उत्तर :** प. पू. रंगावधूत स्वामींना (पू. बापजींना) तुलसीदास यांच्या हनुमान चालीसा प्रमाणे दत्त चालीसा असे स्तोत्र करायचे होते. लिहिता लिहिता त्या ओव्या ५२ झाल्या. पू. बापजी त्या ओव्या कमी जास्त करण्याचा प्रयत्नात असताना दत्तप्रभूंनी प्रगट होऊन सुचवले की यातील एकही ओवी कमी करू नये. वर्षाचे आठवडे ५२, गुरुचरित्राचे अध्याय ५२ म्हणून या स्तोत्राची ओळख "दत्त बावन्नी" अशी राहील व दत्त बावन्नी म्हटले की "रंगावधूत महाराज-नारेश्वर" अशी ओळख होईल !

**प्रश्न ३ : दर गुरुवारी ५२ वेळा दत्त बावन्नीचे ५२ पाठ करायचे ? की ५२ गुरुवारी न चुकता १ वेळा दत्त बावन्नी म्हणायची ?**
**उत्तर :** दत्त बावन्नी ह्या स्तोत्रात पू. बापजींनी स्तोत्राच्या शेवटी स्वच्छ पणे या बाबत खुलासा केला आहे. " बावन गुरुवारे नित नेम । करे पाठ बावन सप्रेम " असे त्यांनी सांगूनच ठेवलेय ! सलग ५२ गुरुवार म्हणजेच सलग ५२ आठवडे, प्रति गुरुवारी ही ५२ ओव्यांची "दत्त बावन्नी" ५२ वेळा म्हणायची आहे. म्हणजेच ५२ गुरुवारी दत्त बावन्नीचे ५२ पाठ करायचे आहेत. एकदा अनुष्ठान स्वरूप सुरू केलं की त्यात खंड पडू देऊ नये !

**प्रश्न ४ : दत्त बावन्नी चे ५२ पाठ एकाच बैठकीत करायचे आहेत कां ? की त्याचे काही अन्य नियम आहेत ?**
**उत्तर : १)** "यथावकाशे नित्य नियम" या न्यायाने. आपल्याला जेव्हा वेळ मिळेल तेव्हा, गुरुवारी आपल्या सोयीने दत्त बावन्नी म्हटली तरी चालेल. १३४ = ५२, २६५= ५२, असे आपल्या सोयीने वेळेचे नियोजन बघून म्हणावी.
२) दत्त बावन्नीचे कोणतेही सोवळ्या- ओवळ्याचे कडक असे नियम नाहीत...सामान्यतः शुचिर्भूतता राखून शुद्ध अंतः करणानी दत्त बावन्नी प्रेमपूर्वक म्हणावी. आज म्हटली, पुढील ६/७ गुरुवार म्हटली. मात्र, नंतर ४/५ गुरुवारी म्हटलीच नाही असे अजिबात करू नये. हा नियम प्रेमभराने " नित्य " चालवावा एव्हढेच महत्वाचे पथ्य आहे.

**प्रश्न ५ : दत्त बावन्नी कधी म्हणावी ? कुठे म्हणावी ?**
**उत्तर : अ)** दत्त बावन्नीचा एक पाठ सकाळी स्नान झाल्यावर म्हणावा. एकदा म्हणायला फक्त ४/५ मिनिटे लागतात. तसेच सायंकाळी दिवे लागणीच्या वेळी पण घरी आपण म्हणू शकता. ज्यामुळे ज्ञात अज्ञात दुष्ट शक्तींचा नाश होऊन, घरातील वातावरण मंगलमय होते. घरात सुख-समाधान नांदते !
**ब)** दत्त बावन्नी आपण कुठेही म्हणू शकता. एखाद्या देवळात, एखाद्या मठात किंवा अगदी आपल्या घरी देवघरात बसून पण म्हणू शकता !



**प्रश्न ६ : दत्त बावन्नी अशौच (सूतक) असताना म्हणली तर चालते का ?**
**उत्तर :** सोयर (वृद्धी) व सूतक (अशौच) असताना जर गुरूवार आला तर त्या गुरुवारी दत्त बावन्नी म्हणू नये.

**प्रश्न ७ : स्त्रियांनी ५२ गुरुवारी अनुष्ठान स्वरूप पठण करताना किंवा एरव्ही दत्त बावन्नी म्हणताना काही नियम आहेत का ?**
**उत्तर :** दत्त बावन्नी हे स्तोत्र आबाल- वृद्धांनी, स्त्री-पुरुष, कोणीही म्हटले तरी चालते. त्यास कोणतेही बंधन नाही. स्त्रियांनी ५२ गुरुवारी ५२ पाठ अनुष्ठान करण्याचा जर संकल्प केला असेल तर मासिक धर्म पालनात जर गुरुवार आला तर तो गुरुवार सोडून पुढील गुरुवार संख्येत धरावा. मासिक धर्मात दत्त बावन्नीचे पठण अजिबात करू नये.

**प्रश्न ८ : दत्त बावन्नीचे गुरुवारी अनुष्ठान करताना धूप/अगरबत्ती लावावी का ?**
**उत्तर :** दत्त बावन्नीचे अनुष्ठान करताना सुवासिक धूप किंवा सुवासिक अगरबत्ती असे जे काही आपल्याकडे उपलब्ध असेल ते अवश्य लावावे. " करी धूप गाएजे एम । दत्त बावन्नी आसप्रेम" असे पू. बापजींनी दत्त बावन्नी मध्ये म्हणून ठेवले. आपण दत्त बावन्नी म्हणताना लावलेल्या अगरबत्तीचा-धूपाचा अभिमंत्रित झालेला "अंगारा" एका डबीत नीट जपून ठेवावा.

**प्रश्न ९ : संपुटीत दत्त बावन्नी म्हणजे काय ?**
**उत्तर :** प. पू. बापजींनी दत्त बावन्नी लिहिली त्याच बरोबर अनेक दत्त स्तोत्रे लिहिली आहेत. " दत्तनाम- संकीर्तन" हे ८४ श्लोकांचे एक स्तोत्र लिहिले. हे स्तोत्र दत्त बावन्नीच्या ५२ पाठांचे अनुष्ठान करताना आधी म्हणायचे नंतर ५२ पाठ दत्त बावन्नीचे म्हणावयाचे व नंतर पुन्हा हे स्तोत्र म्हणायचे याला " संपुटीत दत्त बावन्नी " अनुष्ठान असे म्हणतात. संपुटीत दत्त बावन्नी अनुष्ठान हे अत्यंत प्रभावी साधन आहे.

**प्रश्न १० : दत्त बावन्नीचे ५२ गुरुवारचे अनुष्ठान परिपूर्ण झाल्यावर त्याचे उद्यापन करावयाचे असते का ?**
**उत्तर :** दत्त बावन्नी या स्तोत्राचे जरी ५२ गुरुवारी अनुष्ठान करायचे असले तरी त्याची सांगता झाल्यावर कोणतेही उद्यापन करायचे नाही. त्या बाबत पू. बापजींनी कुठेही लिहिलेलं नाही. शक्य असल्यास ५२ गुरुवारी ५२ पाठ केलेली सेवा एखाद्या दत्तस्थानी, दत्त मंदिरात, गुरुस्थानी जाऊन समर्पित करावी. अशीच अखंड सेवा करण्याचा संकल्प मनी धरून दत्त बावन्नीची अखंड पणे सेवा करत रहावी.

**प्रश्न ११ : दर गुरुवारी ५२ पाठ म्हणणे सुरुवातीला शक्य नसल्यास, दत्त बावन्नीची सेवा कशी करावी ?**
**उत्तर :** आपण दत्त बावन्नी हे स्तोत्र नित्य उपासनेत ठेवावे. रोज सकाळ, सायंकाळी किमान १ तरी पाठ शांतपणे म्हणावा. पुढे दत्त बावन्नी स्तोत्राचे गुजराती शब्द तोंडाला लागले. हळू हळू दत्त बावन्नी पाठ झाली की किमान रोज १३ पाठ म्हणावेत. हळू हळु दत्त कृपेने आपल्याला प्रेरणा झाल्यास " ५२ गुरुवारी न चुकता ५२ पाठ" म्हणण्याचा म्हणजेच दत्त बावन्नीचे एक वर्ष भर अनुष्ठान करण्यास सुरुवात करावी.

**प्रश्न १२ : दत्त बावन्नी गुजराती भाषेत आहे व त्याचे अनुवाद असलेले स्तोत्र पण उपलब्ध आहेत. त्या पैकी कोणती दत्त बावन्नी म्हणावी ? मूळ गुजराती की अनुवादित ?**
**उत्तर :** प. पू. रंगावधुत स्वामींनी हे स्तोत्र मूळ गुजराती भाषेत लिहिले आहे. त्याचे गुजराती उच्चार काही जणांना येत नाही म्हणून मूळ दत्त बावन्नीचा आशय लक्षी घेऊन त्याचा मराठी भाषेत अनुवाद केला गेला. महाराष्ट्रात खूप जण मराठी अनुवाद म्हणतात. मात्र, ज्या रंगावधुत महाराजांनी हे दिव्य स्तोत्र लिहिले आहे ते गुजराती भाषेत आहे. पू. बापजीनी आपली सर्व शक्ती या स्तोत्रात ओतप्रोत भरलेली आहे. प्रत्यक्ष दत्तप्रभूंनी या स्तोत्रावर आपला वरदहस्त ठेवला आहे. म्हणून गुजराती भाषेतील दत्त बावन्नी म्हणणेच हिताचे व श्रेयस्कर ठरेल.

**प्रश्न १३ : गुजराती भाषेतील मूळ दत्त बावन्नी, देवनागरी लिपीत (मराठीत) म्हटली तर चालेल का ?**
**उत्तर :** मूळ गुजराती भाषेतील दत्त बावन्नी सध्या मराठी-इंग्रजी व अन्य भाषेत देशाविदेशातील दत्त भक्त म्हणत आहेत. वाचनासाठी भाषा मराठी पण उच्चार गुजराती होणार असतील तर देवनागरी लिपीत लिहिलेली दत्त बावन्नी अवश्य म्हणावी.

**प्रश्न १४ : दत्त बावन्नीने वाईट शक्तींचा, भूत प्रेत, पितृदोषांचा परिहार होतो का ?**
**उत्तर :** दत्त बावन्नीची निर्मितीच पिशाच्च बाधा, आधी-व्याधी दूर करण्यासाठी झाली आहे.

**प्रश्न १५ : दुर्धर आजार, मानसिक रोग-शारीरिक रोग, आकस्मित संकटे, दैन्य दुःखाचा परिहार दत्त बावन्नीने होतो का ?**
**उत्तर :** प. पू. रंगावधुत महाराजांनी दत्त बावन्नी हे स्तोत्र लिहून तुम्हां आम्हा सर्व दत्त भक्तांवर अमोलिक अशी कृपाच केलेली आहे. दत्त बावन्नी ही " लाख दुःखो की एक दवा " असे दिव्य व प्रासादिक स्तोत्र आहे. दत्त बावन्नी स्तोत्राच्या नित्य पठणाने पठणकर्त्याची सर्व दुःख दूर होतात, सर्व आधी-व्याधींची निवृत्ती होते. दुर्धर आजारही बरे होतात. दत्त बावन्नी स्तोत्राच्या शेवटच्या ८/१० ओव्या वाचल्या की या स्तोत्राची फलश्रुती आपल्याला लक्षात येते.



# श्रीपाद श्रीवल्लभ यांची जन्मकथा माहिती आहे का?

१४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असलेला श्री गणेश आणि भगवान दत्तात्रय यांचे अवतार असलेले श्रीपाद श्री वल्लभ या दोघांचाही जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीचा. कथा अशी की आंध्र प्रदेशातील पिठापुरम या गावी आपण राजा व सुमती हे दाम्पत्य राहत होते. एक दिवस अमावास्येच्या दिवशी त्यांच्या घरी श्राद्ध होते. दुपारच्या वेळी एक अतिथी घरासमोर येऊन भिक्षा मागू लागला. त्यावेळी सुमती एकटीच घरात होती. माते भिक्षावाढ हा आवाज ऐकून ती बाहेर आली. वास्तविक श्राद्धाच्या दिवशी ब्राह्मण जेऊन गेल्याशिवाय जेवण वाढता येत नाही अशा पूर्वीच्या रुढी. परंतु अतिथी भिक्षेकऱ्याचे तेजपुंज रूप पाहून सुमती सर्व काही विसरून गेली व तिने भिक्षा घातली. तो अतिथी साक्षात दत्तगुरू होते. ते प्रसन्न होऊन म्हणाले माते वर माग सुमतीला एकूण चार मुले होती. पण त्यापैकी दोन वारली तर दुसऱ्या दोघांपैकी एक अंध व एक पंगू होता आपल्या दोन्ही मुलांच्या अवस्थेमुळे दुःखी असलेल्या सुमतीने आपल्यासारख्याच तेजमय मुलाची मी अपेक्षा करते अशी विनंती केली दत्तगुरू म्हणाले तुला कुलभूषण तपस्वी कीर्तिमान असा पुत्र होईल तो तुमचे दरिद्र्य हरण करेल हे ऐकून सुमती आनंदी झाली व दत्तप्रभू तिथून अदृश्य झाले पुढे सुमतीला एक तेजोमय पुत्र प्राप्त झाला. त्याचं नाव श्रीपाद असे ठेवले. हा बालक सात वर्षाचा झाला तेव्हा त्याची मुंज केली तोपर्यंत हा चारही वेद म्हणू लागला होता. वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत सर्व ब्राह्मणांना वेदांचे अर्थ सांगत होता. पुढे त्यांनी ब्रह्मचारी राहण्याचा निर्णय घेतला. ते माता-पिताला म्हणाले मला उत्तरेकडे जायचेय तीर्थाटन करायचे आहे मी आई-वडिलांच्या प्रती असलेली सर्व कर्तव्य पूर्ण करेन असे म्हणून त्यांनी त्यांची अमृत दृष्टी त्यांच्या दोन्ही भावंडांवर टाकली आणि दोन्ही भावंडे सुदृढ झाली आणि त्यानंतर श्रीपाद श्री वल्लभ तीर्थाटनासाठी निघाले.

# श्री दत्त तीर्थक्षेत्री कोठे जावे व फलप्राप्ती काय? समस्या काय व सिद्धी काय ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) जर संतानिछुक असाल, मुल होऊ घातले असेल, झाले असेल तर कारंजा गाठून आनंद लहरी येऊ द्या. जिथे जन्मस्थान आहे तिथे सर्व विसरून शांत बसा आणि तुमचा थोडासा अंश आमच्या घरात येऊ द्या असे मागा.
२) जर उद्योग भरभरटीला यायचा असेल, आला असेल तर अमरापूर करा.
३) लहान मुलाला सद्बुद्धी यावी वाटत असेल तर औदुंबर करा.
४) अहंकार येऊ नये असे वाट्त असेल किंवा आला असेल तर शिरोळ ला भिक्षाटन करा, कुमशी करा.
५) जर आपले अजाणता काही झालेले दुष्कृत्य दूर करायचे असेल, भक्ती मार्गात जाताना मन भरकटत असेल तर नृसिंहवाडी करा.
६) जर देवादेवात भेद मनात येत असतील तर हिप्परगी कल्लेश्वर करा.
७) जर कुठलाही मानसिक धक्का अथवा कोलमडून पडण्यासारखे झाले असेल तर उपाय एकच. गाणगापूर संगमावरचे अश्वत्थ औदुंबर भोवती मन निराकार करून आत्मचिंतन, आत्मशुद्धी, स्वतःच्या चुका मान्य करून नवसुरुवात, जे गमावले ते आपले नव्हतेच आणि जे मिळाले किंवा मिळेल तेही आपले नसेल ही भावना ठेवून मन कोरे करून अध्याय वाचावे. न नशिबाला दोष द्यावा न मनुष्याला आणि सगळ्यात महत्त्वाचे, शनी महाराजांनी दिलेला दणका गुरुमहाराज तशच्या तसा भरून काढत नाहीत. ते दुःख हलके करून प्रसंग तरून जायला मदत करतात. म्हणतात ना "चोरून पोळी वाढली असेल, तर ओरडून तूप मागू नये" पण संगम स्थानी वेळ देऊन अपराध मान्य करा.

# पुष्प नंदी नामक शिष्यास मिळालेले प्रसादपुष्प

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विमल पादुका व मनोहर पादुका या पाषाणाच्या असून निर्गुण पादुका कशापासून बनलेल्या आहेत, हे कोणालाच माहीत नाही. विमल पादुका सोडता बाकी दोन्ही पादुकांच्या नावांचे संदर्भ श्रीगुरुचरित्रात पाहायला मिळतात. किंबहुना श्रीगुरुचरित्रातील उल्लेखांमुळेच त्यांची ही नावे रूढ झालेली आहेत. औदुंबर येथे भगवान श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी एक चातुर्मास आपल्या अनुष्ठानात व्यतीत केला होता. त्यांच्या त्या एकांतवासाचा संदर्भ घेऊनच औदुंबर येथील पादुकांना विमल पादुका म्हणत असावेत. पण या नावाचा उल्लेख श्रीगुरुचरित्रात नाही. विमल म्हणजे अत्यंत शुद्ध, कोणताही मल, दोष नसणाऱ्या पादुका. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील पादुकांविषयी स्वतः श्रीनृसिंह




सरस्वती महाराज म्हणतात-
**तुम्हां सहित औदुंबरी । आमुच्या पादुका मनोहरी ।**
**पूजा करिती जे तत्परीं । मनोकामना पुरती जाणा ॥**
देव वाडी सोडून निघाल्यामुळे दुःखी झालेल्या चौसष्ट योगिनींची समजूत घालताना स्वामी महाराज म्हणतात, की जे कोणी भक्त तुम्हां योगिनींसहित आमच्या मनोहर पादुकांची मनोभावे पूजा, सेवा करतील त्यांना इच्छित गोष्ट नक्कीच मिळेल. भगवान श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज शैल्यगमनापूर्वी आपल्या भक्तांना अभयवचन देताना म्हणतात-
**कल्पवृक्षातें पूजोन । यावें आमुचें जेथ स्थान ।**
**पादुका ठेवितो निर्गुण । पूजा करावी मनोभावें ॥**
पुष्प नंदी नामक शिष्यास मिळालेले प्रसादपुष्प भीमा अमरजा संगमावरील कल्पवृक्षसम अश्वत्थाची पूजा करून आमच्या मठस्थानातील निर्गुण पादुकांची मनोभावे पूजा करावी, असे स्वतः श्रीनृसिंह सरस्वती स्वामी म्हणतात. श्रीक्षेत्र गाणगापूर येथील निर्गुण पादुका मात्र अत्यंत अद्भुत व विलक्षण आहेत. या पादुका कशापासून बनवलेल्या आहेत, हे आजवर कोणालाही कळू शकलेले नाही आणि यांना विशिष्ट असा आकार नाही. म्हणून या पादुकांना 'निर्गुण पादुका' म्हणतात. येथे 'निर्गुण' शब्दाचा अर्थ विशिष्ट आकार नसलेल्या व शब्दांनी सांगता न येणाऱ्या पादुका असाच घ्यायला हवा. या निर्गुण पादुकांना पाण्याचा स्पर्श कधीच होत नाही. त्याऐवजी केशर व अत्तराचे वरून लेपन केले जाते. त्या लंबगोल आकाराच्या पेटीमध्ये ठेवलेल्या असतात.

श्री गुरू श्रीशैल्यास जाताना भक्तांना आश्वासन दिले, की ४ प्रसादपुष्प येतील ती मुख्य शिष्यांनी घ्यावी. यापैकी एक पुष्प श्री सायंदेवास मिळाले होते. अनेक दत्त अवतारी सत्पुरुषांना हे गुरुचरित्राच्या मूळ प्रतीवर कडगंची येथे ठेवल्याचे दर्शन झाले. आणखी एक पुष्प नंदी नामक शिष्यास मिळालेले तेही त्यांचे वंशजांनी प्रासादिक म्हणून ठेवलेले आढळते.

# श्री गुरुचरित्र आणि दत्त महात्म्य दोन्ही ग्रंथांत पाताळ लोकाचे वर्णन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दत्त महाराजांच्या अनेक ग्रंथात परलोकाचे वर्णन आले आहे. यात स्वर्ग, पाताळ, वैकुंठ आदी लोकांचा समावेश आहे. वैकुंठ आणि स्वर्ग वर्णन दत्त पुराण आणि दत्त माहात्म्यात, तर पाताळ लोक वर्णन हे गुरुचरित्र आणि दत्त माहात्म्य या दोन्ही ग्रंथात आहे. (आता वाचताना पाताल कि पाताळ हा विचार मनात आल्यास प्रमाण म्हणून दत्त माहात्म्यातील पाताळ हा शब्द प्रमाण मानला आहे.)

दत्त माहात्म्यात पाताळ लोक वर्णन दोनदा आले आहे. राजकुमार ऋतुध्वज घोड्यावरून पातालकेतूचा राक्षसाचा पाठलाग करताना एका गुहेच्या मार्गाने पाताळ लोकात आला. तेव्हा या लोकाचे वैभव पाहून तो मनोमन थक्क झाला. रत्नजडित गोपुरे, लखलखीत द्वारे, गगनचुंबित सुवर्णाची शिखरे, रत्नांची



सोपाने,मोत्यांची तोरणे, इंद्रनीलाच्या भिंती आणि सर्वात आश्चर्यकारक म्हणजे सूर्यप्रकाश नसताना हे सर्व नगर स्वयंप्रकाशित होते. दुसऱ्यांदा पुन्हा हाच ऋतुध्वज नागपुत्रांबरोबर गोमतीच्या पाण्यातून पाताळ लोकात आला.
**पाहुनी पाताळ रचना । पाहुनी दिव्या भवना । घेऊनि नागाच्या दर्शना । म्हणे स्वर्गभुवना आलो कि ॥**
स्वर्गासारखे ते नगर दिसत होते.

गुरुचरित्रात पाताळ लोकाचे वर्णन दोनदा आले आहे. एकदा चौसष्ठ योगिनी गुरुमहाराजांना भिक्षेसाठी घेऊन जातात तेव्हा आणि दुसऱ्यांदा सीमंतिनी आख्यानात. दोन्ही अध्यायात आलेले वर्णन सारखेच आहे. एकोणिसाव्या अध्यायात गंगानुज गुरुमहाराजांच्या मागोमाग कृष्णा प्रवाहाचे दोन भाग झालेले असताना आत गेला तेव्हा त्याला एक अनुपम असे नगर दिसले. या नगरात रत्नखचित गोपुरे होती. या नगराचे वर्णन अमरावतीसमान असे केले आहे यावरून नगराच्या सौंदर्याची कल्पना यावी.
**श्रीगुरु जाता समस्त नर । घेऊन आले आरती ॥ ४८ ॥**
या नगरातील नगरवासी हे योगिनींबरोबर गुरुमहाराजांच्या पूजेकरिता आले असावेत म्हणून असा उल्लेख आहे. आता दुसरे वर्णन हे पस्तिसाव्या अध्यायात आले आहे. सीमंतिनी आख्यानात हे वर्णन आहे. कालिंदी नदीत बुडाल्यानंतर नागलोकातील स्त्रियांनी चित्रांगदाला पाताळ लोकात नेले.
**पाहे पाताळ नगर रचना । जैशी शोभा इंद्रभुवना । गोपुरे रत्नजडित नाना । विद्युल्लतेचियापरी ॥ ८७ ॥**
**इंद्रनीळ वैडूर्येसी । माणिक्य मुक्ताफळासी । महारम्यपुरी ऐसी । सूर्यकांतीने मिरवीत ॥ ८८ ॥**
चित्रांगदाने पाताळ लोकी राहावे म्हणून तक्षक म्हणाला, या अनुपम नगरात कल्पवृक्ष आहेत, अमृत हे पाहावयास देखील मिळत नाही ते इथे पाण्यासारखे भरले आहे, रोगपीडा आणि मरण भय इथे नाही. या नगराप्रमाणे नगर स्वप्नात देखील पाहावयास मिळणार नाही.

चित्रांगदाची कथा नेमकी कुठे घडली हे सांगता येणे कठीण आहे मात्र गंगानुजाची कथा ही अमरेश्वर सन्निधानी घडली असा उल्लेख आहे. गंगानुजाला या बाबतीत वाच्यता कुठेही करू नकोस असे गुरुमहाराजांनी बजावले होते आणि त्याबरहुकूम गंगानुजाने गोपनीयता बाळगली. या गुप्ततेमुळे त्याचे शेत, प्रवाह दुभंगला ती जागा इत्यादी कोणालाही कळले नाही.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)